नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक ३१/०३/२०२६ (मंगळवार )**

# अवघ्या २ तासात जबरी चोरीचा गुन्हा उघड, उमरेड पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन उमरेड :—** पोलीस स्टेशन उमरेड अंतर्गत दिनांक ३०/०३/२०२६ रोजी यातील फिर्यादी धनराज नकटुजी गेडाम,वय ७६ वर्ष, रा. ओवाळा, पो. पळसगाव खुर्द, ता. नागभीड, जि. चंद्रपुर हे उमरेड बस स्थानक येथुन स्वत:चे गावी ओवाळा येथे जाणेकरीता बस ची वाट पाहत असतांना तेव्हा एक अज्ञात इसम त्याचे मोटार सायकल ने फिर्यादी जवळ आला व मी सुदधा ओवाळा येथे जात आहे तुम्ही माझेसोबत चला असे बोलुन फिर्यादी ला त्याचे मोसा वर बसवुन नेले. मौजा धुरखेडा ते मांगरूळ रोड सुनसान ठिकाणी अनोळखी ईसताने त्याची गाडी थांबवुन फिर्यादीला शिवगाळ करून फिर्यादीला जिवे मारण्याची धमकी दिली आणि फिर्यादीचे खिशातुन एकुण ३,०००/— रूपये जबरीने हिसकावुन मोटार सायकल घेवुन पळुन गेला. अशा फिर्यादीच्या रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन उमरेड कलम १४०,३०९(६) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा नोंद केला होता.

मा. श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा,श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण आणि श्रीमती वृष्टी जैन, सहा पोलीस अधिक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी यांच्या मार्गदर्शनात उमरेड पोलीसांनी तात्काळ तपास सुरू करत सी.सी.टी.व्ही. फुटेजच्या आधारे व त्याची गर्दीच्या ठिकाणी गुन्हा करण्याचे पध्दती नुसार आरोपीचा शोध घेणे कामी उमरेड बसस्थानक, भिसीनाका येथील बसथांबा, बायपास चौक येथील बसथांबा इत्यादी ठिकाणी पोलीस अमंलदार नेमण्यात आले. उमरेड पोलीसांना भिसीनाका बसथांबा येथे वयोवृध्द प्रवाशी थांबलेल्या ठिकाणी एक संशयीत इसम

मोटर सायकलने फिरतांना दिसला पोलीसांनी त्याला ताब्यात घेवुन कौशल्यपुर्ण विचारपुस केली असता त्याचे नाव **आरोपी नामे प्रज्वल गजानन गोळे, वय २१ वर्षे, रा. मेंढा, ता भिवापुर, जि नागपुर असुन त्यानेच गुन्हा केल्याची माहीती पोलीसांना समजली.**

**अवघ्या २ तासात जबरी चोरीचा गुन्हा उघड करत पोलीसांनी नमुद आरोपीकडुन गुन्हयात चोरीस गेलाला संपुर्ण मुद्देमाल रोख रक्कम ३,०००/— रूपये आणि गुन्हा करण्यासाठी वापरलेली मोटर सायकल किंमती २०,०००/— रूपये असा एकुण २३,०००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. आरोपीला अटक करण्यात आली आहे.**



**गुन्हा उघडकीस आणणारे तपास पथक जप्त मुद्देमालासह**

# सराईत गुन्हेगार वरून कुलदिपसिंग बिसेन उर्फ वरून ठाकुर याला रामटेक पोलीसांनी एमपीडीए कायदया अंतर्गत केले स्थानबध्द

पोलीस स्टेशन रामटेकः— पोलीस स्टेशन रामटेक हद्दीतील सराईत आरोपी नामे **वरून कुलदिपसिंग बिसेन उर्फ वरून ठाकुर, वय ३१ वर्ष, रा. विटभट्टा, मनसर ता. रामटेक जि. नागपुर** याचे वर खुनाचा प्रयत्न ,अवैध अग्निशस्त्र बाळगने या सारखे अनेक गंभीर गुन्हे नोंद आहे. नमुद आरोपी हा असे गुन्हे करण्याच्या सवयीचा आहे.त्याच्या असमाजिक कृत्याची माहीती पोलीसांना देणाऱ्या लोकांमध्ये तो भय निर्माण करून दहशत पसरवित होता. नागपुर ग्रामीण पोलीसांना त्याचेविरूध्द जेव्हा जेव्हा तक्रारी प्राप्त झाल्या त्या त्या वेळी गंभीर दखल घेवुन त्याचे विरूध्द गुन्हे नोंद केले व त्याला अटक केले आहे. पोलीसांनी आरोपीचे गुन्हेगारी कृत्यांवर नियंत्रण ठेवण्याकरीता वेळोवेळी त्याचेवर प्रतिबंधक कार्यवाही सुध्दा केली आहे. तरीसुध्दा आरोपीने आपली गुन्हेगारी गतिविधी निरंतर सुरूच ठेवली.

**आरोपींचे कृत्य समाजिक सुव्यवस्थेला बाधक ठरत असल्याने तसेच आरोपी समाजासाठी धोकादायक ठरत असल्याने मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनाखाली रामटेक पोलीसांकडुन एमपीडीए कायदयान्वये कार्यवाही करण्यात आली. मा. जिल्हाधिकारी ,नागपुर यांनी सराईत गुन्हेगार वरून कुलदिपसिंग बिसेन उर्फ वरून ठाकुर, वय ३१ वर्ष, रा. विटभट्टा, मनसर ता. रामटेक जि. नागपुर याचे विरूध्द स्थानबध्दतेता आदेश काढला असता रामटेक पोलीसांनी तात्काळ आरोपीचा शोध घेवुन दिनांक ३१/०३/२०२६ रोजी त्याला ताब्यात घेतले नमुद आरोपीला अटक करून कारागृह नागपुर येथे दाखल केले आहे.**



**आरोपी वरून कुलदिपसिंग बिसेन उर्फ वरून ठाकुर,**

## क्रिकेट सट्टा /बेटिंग लावुन जुगार खेळणाऱ्यांवर गुन्हा नोंद स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीण यांची कामगिरी

**पोलीस स्टेशन काटोल :—** दिनांक ३०/०३/२०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखा नागपुर ग्रामीण यांचे पथक अवैध धंदयावर कारवाई करणेकामी पेट्रोलींग करीत असतांना त्यांना गुप्त बातमीदारा मार्फतीने माहीती प्राप्त झाली की, टाटा इंडियन प्रीमियर लीग राजस्थान रॉयल्स विरुद्ध चेन्नई सुपर किंग आय पी एल क्रिकेट मॅच असल्याने काटोल हद्दीत आय यु डी पी कॉलनी, वार्ड नं. ७ येथील चौकामध्ये गौरव बुरंगे नावाचा इसम त्याच्या घरासमोर बसुन टाटा इंडियन प्रीमियर लीग २०२६ या सिरीजमधील राजस्थान रॉयल्स विरुद्ध चेन्नई सुपर किंग या संघा दरम्यान खेळल्या जाणाऱ्या क्रिकेट सामन्यावर मोबाईल द्वारे लोकांकडुन पैसे घेवुन हार जीतचा जुगार खेळत आहे. अशा विश्वसनिय माहीतीवरून पोलीस घटनास्थळी पोहचले असता काटोल येथील आय यु डी पी कॉलनी, वार्ड नं. ७ येथील चौकामध्ये एक ईसम मोबाईलचा वापर करताना दिसला. त्यास विचारपुस केली असता **आरोपी क्र. १) गौरव विलासराव बुरंगे, वय ३५ वर्ष, रा. आय यु डी पी कॉलनी, वार्ड नं. ७ असे सांगितले. सदर आरोपीने** अँड्रॉइड मोबाईल मध्ये आयडी बनवुन बेंटींग साईटवरून अवैधरित्या ऑनलाइन पद्धतीने विविध बेटिंग आयडी द्वारे स्वत:च्या आर्थिक फायदयासाठी क्रिकेट

सट्टयावर ग्राहकाकडुन ऑनलाईन पैसे घेतल्याचे दिसुन आले. तसेच आरोपी क्र. १. याला विचारपुस केली असता तो आरोपी क्र. २) **आरोपी विनय उर्फ विनू राजेश्वर वर्मा, वय ३७ वर्षे, रा. खोजा लेआउट, काटोल याचे सांगणेवरून किक्रेट सट्टा चालवित असल्याची माहीती प्राप्त झाली. पोलीस पथकाने तात्काळ आरोपी क्र. २) याचा शोध घेवुन त्याला खोजा लेआउट, काटोल येथुन ताब्यात घेवुन त्याला अधिक विचारपुस केली असता त्याने सांगितले की, आरोपी क्रं ३) शिराज खान (शिराजभाई), रा. टेलिफोन एक्सचेंज चौक, नागपूर याचे सांगणेवरून ऑनलाईन क्रिकेट सट्टा खेळत/खेळवित असल्याची माहीती प्राप्त झाली.**

**पोलीसांनी पंचासमक्ष अरोपीतांच्या ताब्यातुन १) २ वगेवगळया कंपनीचे अॅड्रॉरॉईड मोबाईल किंमती ६८,०००/— रुपये असा एकूण ६८,०००/— रुपयांचा मुददेमाल जप्त करण्यात आला आहे. नमुद तिन्ही आरोपीतांविरूध्द पोलीस स्टेशन काटोल येथे कलम १२ (अ) म जु का, ४९ भान्यासं अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**

## अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा नोंद वाहनासह ०८ लाख ५ हजार रूपयांचा मुद्देमाल जप्त स्थानिक गुन्हे शाखा नागपुर ग्रामीण यांची कामगिरी

**पोलीस स्टेशन जलालखेडा** :— दिनांक ३१/०३/२०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक अवैध धंदयावर कारवाई करणे कामी पेट्रोलींग करीत असतांना त्यांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, अवैधरीत्या रेतीची चोरटी वाहतुक होत आहे. मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलीसांनी पोलीस स्टेशन जलालखेडा हद्दीत थडीपवनी आंध्रफाटा, ता. नरखेड येथे नाकाबंदी केली असता आयशर कंपनीचा ट्रॅक्टर क्र. एम एच—४०डी—५८४८ ट्रॉलीसह मिळून आल्याने वाहन थांबवुन वाहनाची पाहणी केली असता त्यामध्ये रेती (गौणखनिज) आढळुन आली. **ट्रॅक्टरचा चालक नामे भूमेश्वर सुरेंद्र शेळके, वय २३ वर्ष, रा. सायवाडा, ता. नरखेड, जि. नागपूर हा मिळुन आला.** पोलीसांनी आरोपी चालकास रेती वाहतूकीच्या परवान्याबाबत विचारपुस केली असता त्याच्याकडे कोणताही परवाना नसल्याबाबत माहीती प्राप्त झाली. वाहन चालकास मालकाचे नाव विचारले असता स्वत:च मालक असल्याची माहिती प्राप्त झाली. **पोलीसांनी पंचासमक्ष वर नमुद आयशर कंपनीचा**

**ट्रॅक्टर क्र. एम एच–४०/डी–५८४८ व ट्रॉली किंमती ८,००,०००/– रूपये २) ०१ ब्रास रेती (गौणखनिज) किंमती ५,०००/– रूपये असा एकुण ८०५०००/– रूपयांचा मुद्देमाल जप्त केला.**

**नमुद आरोपी चालक व मालक भूमेश्वर सुरेंद्र शेळके, वय २३ वर्ष, रा. सायवाडा, ता. नरखेड, जि. नागपूर याच्या विरूध्द पोस्टे जलालखेडा येथे कलम ३०३(२) भा.न्या.सं अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**




## नागपुर ग्रामीण जिल्ह्यातील ७२८ रेकॉर्डवरील आरोपीतांची घेण्यात आली आरोपी परेड

मा. श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात आज दिनांक ३१/०३/२०२६ रोजी नागपुर ग्रामीण जिल्हयातील सर्व २२ पोलीस स्टेशनला शरीराविरूध्दचे गुन्हे करणारे, मालमत्ते विरूध्दचे गुन्हे करणारे, महीला व बाल अत्याचार

गुन्हेगार ,अवैध दारू, जुगार इतर अवैध धंदयामधील रेकॉर्डवरील आरोपींतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे. **एकुण ७२८ आरोपीतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे.**

**नागपुर उपविभाग** :— नागपुर उपविभागातील पोलीस स्टेशन बुटिबोरी येथे ३८ आरोपी, पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी येथे ३० आरोपी आणि पोलीस स्टेशन बेला येथे ३३ आरोपी अशा एकुण १०१ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**उमरेड उपविभाग** :— उमरेड उपविभागातील पोलीस स्टेशन उमरेड येथे ३६ आरोपी , पोलीस स्टेशन कुही येथे ३१ आरोपी आणि पोलीस स्टेशन भिवापुर येथे २३ आणि पोलीस स्टेशन वेलतुर ३० आरोपी अशा एकुण रेकॉर्डवरील १२० आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**सावनेर उपविभाग :—** सावनेर उपविभागातील पोलीस स्टेशन सावनेर येथे ३० आरोपी , पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे ३७ आरोपी आणि पोलीस स्टेशन खापा येथे २७ आरोपी आणि पोलीस स्टेशन केळवद येथे ३० आरोपी अशा एकुण १२४ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**कन्हान उपविभाग** :— कन्हान उपविभागातील पोलीस स्टेशन कन्हान येथे ३२ आरोपी , पोलीस स्टेशन मौदा येथे १७ आरोपी, पोलीस स्टेशन वडोदा येथे १२ आरोपी अशा एकुण ६१ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**रामटेक उपविभाग :—** रामटेक उपविभागातील पोलीस स्टेशन रामटेक येथे ५० आरोपी , पोलीस स्टेशन पारशिवणी येथे ३५ आरोपी, पोलीस स्टेशन अरोली येथे ३१ आरोपी आणि पोलीस स्टेशन देवलापार येथे २३ आरोपी अशा एकुण १३९ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**काटोल उपविभाग :—** काटोल उपविभागातील पोलीस स्टेशन काटोल येथे ७६ आरोपी , पोलीस स्टेशन कोंढाळी येथे २९ आरोपी आणि पोलीस स्टेशन नरखेड येथे ५० आरोपी आणि पोलीस स्टेशन जलालखेडा येथे २८ आरोपी अशा एकुण १८३ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**(सर्व ६ उपविभागातील सर्व २२ पोलीस स्टेशन येथे एकुण ७२८ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे. )**




गोपनिय शाखा

# अवैधरित्या विनापरवाना दारू काढणारे, दारू बाळगुण विक्री करणाऱ्या तसेच सेवन करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध १९ गुन्हे नोंद

दिनांक ३०/०३/२०२६ रोजी दारूबंदी कायदा अंतर्गत विविध पोलीस स्टेशनला पोलीसांनी अवैधरित्या दारू बाळगुन विक्री करणाऱ्यांवर छापा टाकुन देशी दारू, मोहाफुल दारू असा एकुण ९,६३५/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम अन्वये एकुण १९ गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

पोलीस स्टेशन भिवापूर येथे ०१ गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन वेलतूर येथे १ गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन उमरेड येथे १ गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी येथे एकुण ३ गुन्हे नोंद आहे. पोलीस स्टेशन बेला येथे एकुण ०२ गुन्हे नोंद आहे. पोलीस स्टेशन नरखेड येथे एकुण ३ गुन्हे नोंद आहे. पोलीस स्टेशन खापा येथे एकुण ०२ गुन्हे नोंद आहे. पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे ०२ गुन्हे नोंद आहे. पोलीस स्टेशन सावनेर येथे १ गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन केळवद येथे १ गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन देवलापार येथे ०२ गुन्हे नोंद आहे. महाराष्ट्र दारू बंदी अधिनियम अन्वये एकुण १९ नोंद केले आहे.

**सदर कारवाईत ९३६० मिली देशी दारू, ५५ लीटर मोहाफुल दारू असा एकुण ९,६३५/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. नाशवंत मुद्देमाल पंचानामा कारवाई करून नष्ट करण्यात आला आहे.**

मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने